प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
SM
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड, न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701
एक वेळ अवश्य भेट द्या 8459953702

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक, सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार २० ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ ले ● अंक ५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# तर मी राजीनामा देऊन निवृत्ती घेतो:; देवेंद्र फडणवीसांच्या विधानाने राजकीय वर्तुळात खळबळ

## देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

शेष प्रेम आहे. पण मी त्यांना सांगू इच्छितो की राज्याचे सगळे अधिकार हे मुख्यमंत्र्यांकडे असतात. इतर सगळे मंत्री हे मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या अधिकारांवर काम करत असतात. एकनाथ शिंदे आणि मी एकत्र काम करतो. त्यामुळे मी त्याच्या पुढे जाऊन सांगू इच्छितो की, एकनाथ शिंदे यांना पूर्ण पाठिंबा आणि पाठबळ माझं आहे. त्यामुळे मनोज जरांगे यांनी या सगळ्या प्रश्नांची उत्तरं एकनाथ शिंदे यांना विचारावीत, असं फडणवीस म्हणाले.जर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी असं म्हटलं की, मराठा आरक्षणासंदर्भात कुठलाही निर्णय घ्यायचा प्रयत्न त्यांनी केला आणि तो प्रयत्न मी थांबवला तर त्या क्षणी मी माझ्या पदाचाही राजीनामा देईन आणि राजकारणातून देखील निवृत्त होईल, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.



राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणावर भाष्य केलं. मनोज जरांगेंकडून करण्यात आलेल्या आरोपांना फडणवीसांनी उत्तर दिलं आहे. एकनाथ शिंदे जर म्हणाले की मी मराठा आरक्षण देण्यात अडथळा आणतो आहे, तर मी माझ्या पदाचा राजीनामा देतो आणि राजकारणातून निवृत्ती घेतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणालेत. काल मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर एक बैठक झाली. पुणे जिल्ह्यातील दौंडच्या विविध प्रकल्प आणि योजनांसंबंधी बैठक झाली. या बैठकीनंतर देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. तेव्हा त्यांनी मराठा आरक्षणावर भाष्य केलं.

## जरांगे काय म्हणाले होते?

जर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी असं म्हटलं की, मराठा आरक्षणासंदर्भात कुठलाही निर्णय घ्यायचा प्रयत्न त्यांनी केला आणि तो प्रयत्न मी थांबवला तर त्या क्षणी मी माझ्या पदाचाही राजीनामा देईन आणि राजकारणातून देखील निवृत्त होईल, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. त्यांना पश्चाताप झालाय. तुम्ही राज्याचे कर्ते आहात. तुम्ही मराठा समाजाचं आरक्षण रोखलं आहे हे सत्य आहे, तुम्ही ते आरक्षण द्या ना... सग्या सोयऱ्याची अंमलबजावणी तुम्ही रोखली आहे. ते तुम्ही नाकारून चालणार नाही, असं मनोज जरांगे म्हणालेत.देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा देण्याबाबत विधान केल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यात देवेंद्र फडणवीस यांचा मोठा वाटा आहे. त्यांना मराठा विरोधी म्हणणं चूक आहे, असं ते म्हणाले.



# मुकुंदराज महाराज व श्री योगेश्वरी देवी मंदिरातील विकास कामासाठी ५ कोटी रुपयांच्या निधी आ.नमिता मुंदडांचा पाठपुरावा

**अंबाजोगाई।प्रतिनिधी**

राज्यभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री योगेश्वरी देवी मंदिर व मुकुंदराज महाराज मंदिर परिसरातील विकासकामांसाठी राज्य शासनाने प्रत्येकी २ कोटी ६० रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून विकासकामांना लवकरच सुरु होणार असल्याची माहिती आ. नमिता मुंदडा यांनी दिली. मंदिर परिसरातील विकासकामांना निधी मिळविण्यासाठी आ. मुंदडा यांनी दिड वर्षे सातत्याने पाठपुरावा केला होता. लोकसभेची आचारसंहिता सुरु होण्यापूर्वी पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन त्यांनी मंदिराची पाहणी देखील केली होती. आ. नमिता मुंदडा यांनी रस्ते, आरोग्य, शिक्षण यासह धार्मिक स्थळांच्या विकासासाठी प्रयत्नपूर्वक भरघोस निधी आणून केज विधानसभा मतदार संघाचा कायापालट करून परिपूर्ण विकास सुरु ठेवला आहे. आ. मुंदडा यांनी वर्षानुवर्षे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे शासनाकडूनही केज मतदार संघात निधी घेचून आणत मतदार संघात विकासकामे गतीने सुरु आहेत.


# राजेंद्र बन्सोडे, भास्कर जाधव यांची मराठवाडा चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या कार्यकारिणीवर निवड

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

बीड : प्रतिनिधी मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्सची बैठक रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडली. या बैठकीत नुतन कार्यकारिणी सदस्यपदी बीड येथील राजेंद्र बन्सोडे व भास्करराव जाधव यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष मानसिंग पवार, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी उपाध्यक्ष सत्यनारायण लाहोटी, महाराष्ट्र चेंबर चे उपाध्यक्ष प्रफुल्ल मालानी, मराठवाडा अध्यक्ष आदेशपाल छाबडा यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक झाली. यामध्ये मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स अध्यक्षपदी आदेशपाल



छाबडा यांची फेर निवड करण्यात आली. तर वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून सुरेंद्र रेदासनी, सचिव पदी जफर मिर्झा यांची निवड करण्यात आली.



तसेच मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स कार्यकारणीवर बीड मधून दोन सदस्याची निवड करण्यात आली. त्यामध्ये राजेंद्र बन्सोडे व भास्करराव जाधव यांचा समावेश आहे. यावेळी बीड जिल्ह्यातील प्रतिनिधी म्हणून बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे, जिल्हाध्यक्ष भास्करराव जाधव, राजेंद्र बन्सोडे, सुरेंद्र रेदासणी, जफर मिर्झा,संतोष अब्बड ,गणेश लोहिया, प्रभाकर होके, सुनील भांडेकर,रामेश्वर टवाणी,लक्ष्मीनारायण मुंदडा, बंब इत्यादी व्यापारी बांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

--------

# पोलीस तपासकार्य एक मार्गदर्शिका पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न

**बीड प्रतिनिधी :-**धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गड येथील विकासासाठी जिल्ह्यातील भक्तगण सरसावलेले आहेत. उखंडा (ता.पाटोदा) येथील ग्रामस्थांनी १ लाख ७ हजार रूपयाची देणगी गडाचे महंत शिवाजी महाराज यांच्याकडे सुपूर्द केली. शिवाय भविष्यातही आम्ही गडासाठी वाट्टेल ती मदत करू, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.श्री.क्षेत्र नगद नारायण गडावर बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातून भक्त येत असतात. येणाऱ्या भक्तांची चांगली सोय व्हावी, आणि गडाचा विकास व्हावा, यासाठी शासनासह भक्तगणही देणगीच्या रूपाने मोकळा हात सोडत आहेत. उखंडा येथील ग्रामस्थांनी श्री.क्षेत्र नगद नारायण गडाची दिंडी पंढरपूरला जात असताना दिंडीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी गावात वर्गणी जमा केली होती. सदरील वर्गणीतून वारकऱ्यांची सेवा केल्यानंतर १ लाख ७ हजार रूपयांची रक्कम शिल्लक होती.



सदरील रक्कम वारकऱ्यांच्या सेवेसाठी जमा केलेली होती, आणि ती रक्कम गडाच्याच कामी यावी, अशी भावना ठेवून ग्रामस्थांनी एकत्रित येत सदरील रक्कम श्री. क्षेत्र नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांची गडावर भेट घेवून सुपूर्द केली. उंखडा येथील ग्रामस्था महिना वारीनिमीत्त नारायण गड येथे दर्शनासाठी येत असतात. त्यांची गडावर श्रध्दा असून यापुढे देखील गडाच्या विकासासाठी आम्हाला शक्य तो हातभार लावू, असेही त्यांनी म्हटले. यावेळी गावातील जेष्ठ नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# आक्षेपा़र्ह वक्तव्य करणाया महंत रामगिरी महाराजांवर बीड,गेवराई,आष्टीत गुन्हे दाखल

बीड ।प्रतिनिधी

(बीड-विवेक कुचेकर) सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी नाशिक येथील सिन्नरच्या पंचाळे गावामध्ये प्रवचनावेळी मुस्लिम धर्माचे प्रेषित मोहम्मद पैगंबर आणि त्यांच्या पत्नीविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्याविषयी मुस्लीम समाजात संतप्त पडसाद उमटत असतानाच आता महंत रामगिरी महाराजांवर पोलीस कारवाईला सुरुवात झाली आहे. बीड जिल्ह्यातील बीड , गेवराई आणि आष्टी पोलीस ठाण्यात महंत रामगिरी महाराजांवर गुन्हे दाखल झाले आहेत. वादग्रस्त वक्तव्यामुळे महंत रामगिरी महाराज आणि विरोधात तीव्र पडसाद उमटले होते. याच अनुषंगाने जिल्ह्यातील बीड शहर गेवराई आणि आष्टी पोलीस ठाण्यात महंत रामगिरी यांच्याव गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सरला बेट येथील महंत रामगिरी महाराज यांनी सप्ताहातील प्रचारादरम्यान मुस्लिम समाजाविषयी केलेल्या वक्तव्याचे राज्यभर पडसाद उमटत आहे. त्यामुळे बीडमध्ये देखील मुस्लिम बांधव आक्रमक झाले होते. महंतांवर कारवाईच्या मागणीसाठी ठिकठिकाणी निवेदन देण्यात आली. आणि याच अनुषंगाने एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शफिक शेख यांच्या तक्रारीवरून बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तर गेवराईत सय्यद हुसेने यांनी महंत रामगिरी यांच्याविरोधात तक्रार दिली होती. आष्टी पोलीस ठाण्यात नाजीम शेख यांनी भावना दुखावल्याची तक्रार दिली होती. बीड पाठोपाठ महंत रामगिरी महाराज यांच्या अडचणीत सातत्याने वाढ होत झालेली आहे. मुंबईच्या पायधुनी पोलिस ठाण्यात महंत रामगिरी महाराजांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महंत रामगिरी महाराज यांनी हेतूपूर्वक दोन समाजात तेढ निर्माण होतील, असे वक्तव्य केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. पायधुनी पोलिस ठाण्यात महंत रामगिरी महाराजांविरोधात कलम १९६(१),(अ), २९९,३०२,३ ५२,३५३(२), ३५३(३),३५६, भा.न्या.संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार आता पोलिसांचा पुढील तपास सुरु आहे. पोलीस आता महंत रामगिरी यांच्यावर अटकेची कारवाई करणार, हे पाहावे लागेल.

# आ.नमिता मुंदडा यांच्या हस्ते मतदार संघातील विविध कामाचे भूमिपूजन संपन्न

**अंबाजोगाई।प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदारसंघातील विविध पायाभूत सोयीसुविधा विकास कामाचे भूमिपूजन आ.नमिता मुंदडा यांच्या हस्ते सोमवारी पार पडले. केज विधानसभा मतदारसंघातील विविध गावात प्रमुख गावात येण्यासाठी रस्त्याची दुरवस्था झाली होती. ग्रामीण भागातील नागरिकांची समस्या लक्षात घेऊन व दळणवळणाची सोय व्हावी म्हणून शासन दरबारी पाठपुरावा करून



आ.मुंदडा यांनी येल्डा ते ममदापुर रस्ता (७ कोटी रुपये), ममदापुर परळी पुल (१.२८ कोटी रुपये ), राक्षसवाडी ते चिचखंडी रस्ता ( ३.९७ कोटी रुपये ), चिचखंडी ते भावठाणा रस्ता (२.३८ कोटी रुपये), डोंगर पिंपळा ते राजेवाडी रस्ता - (२.१८ कोटी रुपये),प्रजिमा ५१ ते सोनवळा रस्ता (२.४८ कोटी रुपये ), भावठाणा फाटा ते धावडी रस्ता ( १.५० कोटी रुपये), धावडी ते उमराई रस्ता ( १.२५ कोटी रुपये) आदी कामे मंजूर करून घेतले.सोमवारी सकाळी आ.नमिता मुंदडा यांच्या हस्ते विविध कामाचे भूमिपूजन थाटात संपन्न झाले. या भूमिपूजन प्रसंगी मधुकरराव काचगुंडे, बाळासाहेब दोडतले, बालासाहेब शेप, शंकर अण्णा उबाळे, लक्ष्मण करनर, येल्डा येथील संभाजी शिंदे, लक्ष्मण करणर, ॲड.कैलास चामनर, बापूराव खोडवे, आण्णा चामनर, ममदापूर येथील सरपंच रमेश मुंडे , हनुमंत रूपनर, वाल्मीक मुंडे, नारायण रूपनर, प्रशांत लवटे, राक्षसवाडी येथील राम कांबळे सरपंच, बाबा गडदे, अंकुश गडदे, बिबिशन गडदे, राधाकिसन कुंडगर, चीचखंडी येथील गुणवंत बिरगड माजी सरपंच, अभिजीत गडदे, आबासाहेब गडदे, रामभाऊ गडदे, तुकाराम गडदे, किशोर गडदे, भावठणा येथील सरपंच नंदकिशोर पारीख, आर.डी. नायक यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते.

## अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे २४ ऑगस्ट रोजी आयोजन

## बँकेच्या सर्व सभासद व ग्राहकांनी उपस्थित रहावे-राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई।प्रतिनिधी**

येथिल अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन दि.२४ ऑगस्ट शनिवार रोजी सायंकाळी सहा वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या वार्षिक सर्वसाधारण सभेस बँकेच्या सर्व सन्माननीय सभासद व ग्राहकांनी उपस्थित राहण्याचे अवाहन बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी व मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे .

मागच्या सत्तावीस वर्षापूर्वी अंबाजोगाई शहराची आर्थिक गरज लक्षात घेवून केवळ शहरासाठीच राजकिशोर मोदी व त्यांच्या काही निवडक सहकाऱ्यांनी मिळून अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची सुरुवात केली होती. मात्र आज ही बँक आपल्या आर्थिक बळाच्या जोरावर १८ शाखेच्या माध्यमातून मोठ्या डौलाने व दिमाखात नागरिकांना सेवा देत कार्यरत आहे . आज केवळ अंबाजोगाई शाखेत ३५ हजाराच्या वर ग्राहक आहेत.



तर बँकेच्या सर्व शाखांचे मिळून एक लाखाच्या वर ग्राहक आहेत. आज बँकेने वार्षिक उलाढालीत ५०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे .या बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२४ ऑगस्ट शनिवार रोजी संध्याकाळी ६ वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आली आहे . बँकेच्या वार्षिक सभेनंतर लगेच प्रीती भोज व कलारंजन मुंबई निर्मित महाराष्ट्राची लोकसंस्कृती व संगीत परंपरेचा देखणा आविष्कार उदय साटम व ज्यातो साटम यांचा “मराठी लोकधारा” हा मराठमोळा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमाचा आस्वाद सर्व ग्राहक, सभासद व शहरवासीयांनी घ्यावा तसेच बँकेच्या २८ व्या आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेस सर्व सभासद मंडळींनी उपस्थित राहून बँकेस सहकार्य करावे असे आवाहन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी , उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तसेच सर्व सन्माननीय संचालक मंडळ तथा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे .

## बीडच्या कंकालेश्वरमध्ये तरुणाची आत्महत्या

(बीड-विवेक कुचेकर) शहरातील प्रसिद्ध पुरातन मंदिर असलेल्या कंकालेश्वर मंदिराच्या कुंडात आज पहाटे एका २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आला आहे. पेठ बीड पोलिसांनी सकाळी सदर मृतदेह पाण्यातून बाहेर काढला असून मृताची ओळख पटविणे सुरु असल्याची माहिती पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी दिली. बीड शहरातील प्रसिद्ध असलेल्या कंकालेश्वर मंदिरात काल रात्री एका २५ वर्षीय तरुणाने पाण्याने भरलेल्या कुंडात उडी मारून आत्महत्या केली. पोलिसांच्या तपासातून मृताच्या शरीरावर कोणत्याही प्रकारच्या जखमा आढळून आलेल्या नाहीत. त्यामुळे ही आत्महत्याच असल्याचा दावा करण्यात येतं आहे. सदर तरुणाची अद्याप ओळख पटलेली नाही. पेठ बीड पोलीस या घटनेचा तपास करीत असून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे कळते.

# मुस्लिम समाजासाठी ना.अजितदादा पवार यांचे अनेक कल्याणकारी निर्णय : इद्रिस नायकवडी

## बीडमध्ये अल्पसंख्याक सेलचा आढावा; अनेक तरुणांचे रा.कॉं. पक्षामध्ये प्रवेश

### तरुणांच्या प्रवेशाने क्षीरसागरांची ताकद वाढली

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस नायकवडी यांच्या उपस्थितीत आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वात अनेक मुस्लिम समाजातील युवकांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यामुळे बीड मतदारसंघात डॉ.योगेश क्षीरसागर यांची ताकद वाढली आहे.

### इद्रिस नायकवडी जमिनीवर राहून काम करणारे नेतृत्व - डॉ.योगेश क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर बोलताना म्हणाले की, लोकसभेच्या निवडणुकीत विरोधकांकडून मोठ्या प्रमाणात नरेटिव्ह पसरविण्यात आले. मात्र आता लोकांना हे समजले असल्यामुळे मोठ्या संख्येने पक्षात प्रवेश होत आहेत. विविध जाती धर्मातील तरुण कार्यकर्ते, महिला कार्यकर्त्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात सामील होत आहेत. त्यामुळे अजित दादा यांची ताकत वाढत आहे. इद्रिस नायकवडी हे जमिनीवर राहून काम करणारे नेतृत्व आहे. अल्पसंख्याक समाजातील अनेक समस्या त्यांनी सोडवल्या आहे. त्यामुळे नक्कीच पक्षाला याचा फायदा होईल. अजितदादा पवार यांनी बीड मतदार संघातील विविध कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला, त्यामुळे मतदार संघातील अनेक कामे पूर्ण झाली. यामुळे देखील पक्षात अनेक लोक प्रवेश करत आहेत. प्रशासक असून देखील महायुतीच्या सरकारमुळे मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकास कामे झाली. मुस्लिम ख्रिश्चन अशा अल्पसंख्याक भागात देखील अनेक विकासाची कामे पूर्ण झाली आहेत. आम्ही अल्पसंख्याक समाजासाठी कायमच तत्पर असल्याचे देखील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

### डॉ.योगेश क्षीरसागर यांना मोठ्या ताकदीने विधानसभेत पाठवा -इद्रिस नायकवडी

बीड मतदारसंघातील सामान्य लोकांसाठी दिवसरात्र झटणाऱ्या डॉ.योगेश क्षीरसागर यांचे काम अत्यंत चांगले असून लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते कायमच प्रयत्नशील असतात. क्षीरसागर यांनी मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानसाठी जागा दिली. असे अनेक चांगले काम केल्यामुळे त्यांच्या कामाची स्तुती केली पाहिजे. अशा होतकरू सुशिक्षित संयमी युवा नेतृत्वाची राजकारणाला गरज असून त्यांना जनतेने मोठ्या ताकदीने विधानसभेत पाठवावे, असे आवाहन इद्रिस नायकवडी यांनी केले.



**बीड प्रतिनिधी**

दि.१८ : मुस्लिम समाजासाठी ना.अजितदादा पवार यांचे अनेक कल्याणकारी निर्णय घेतले आहेत. समाजाच्या सुरक्षेच्या दृष्टीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षासोबत राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस नायकवडी यांनी केले. प्रदेशाध्यक्ष इद्रिस नायकवडी हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता रविवारी (दि.१८) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या संपर्क कार्यालयात आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, अल्पसंख्याक सचिव मोमीन सिद्दिक, अल्पसंख्याकचे बीड जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, लिगल सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड.नागेश तांबारे, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, महिला जिल्हाध्यक्षा शाकेरा शेख, विद्यार्थी ग्रामीण जिल्हाध्यक्ष इंजि.अजिंक्य आनेराव, शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, शहराध्यक्ष माजेद कुरेशी, नगरसेवक शेख इलियास, जैतुल्ला, बिलाल शेख, रमीज शेख, समीर शेख, जावेद शेख, सादेक सिद्दीकी, नबिल जमा, शारेक जकेरिया, मुजीब ए.वन, अमर विद्यागर, विठ्ठल गुजर, नाजू बागवान, जाफर इनामदार, शेख युनूस, अन्वर खान पठाण यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अल्पसंख्याक विभागाचे सर्व पदाधिकारी, महिला पदाधिकारी यांच्यासह अल्पसंख्याक सेलचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना इद्रिस नायकवडी म्हणाले की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारांवर चालत आहे आणि यापुढे देखील चालत राहील. मुस्लिम समजासाठी संरक्षण, शिक्षण आणि आरक्षण या तीन बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत. यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे कायमच समाजाप्रती कल्याणकारी योजना आखून आपली स्पष्ट भूमिका घेतात. इतर समाजाप्रमाणे मुस्लिम समाजाला देखील मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी अजित दादांनी विविध योजनांद्वारे निधी उपलब्ध करून दिला आहे. मुस्लिम समाजातील विद्यार्थांना चांगले शिक्षण घेता यावे, यासाठी देखील त्यांनी मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. मागच्या लोकसभेचा विषय सोडून देऊन येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला आणि अजितदादा पवार यांच्यावर विश्वास ठेवावा. येणाऱ्या काळात समाजाच्या सुरक्षेचा विचार करावा लागेल. लोकसभेच्या निवडणुकीत समाजाचा राग होता तो मतदानातून त्यांनी व्यक्त केला. मात्र आता ही चूक परत न करण्याची विनंती देखील त्यांनी मुस्लिम समाजाला केली. निवडणुकीत विरोधकांनी नरेटीव्ह पसरवला होता. मात्र आता परत ते होणार नाही. त्यांनी किती ही नरेटीव्ह पसरवण्याचा प्रयत्न केला तरी त्यात ते यशस्वी होणार नाहीत. महायुतीच्या पाठीशी समाजाने भक्कमपणे उभा राहण्याचे आवाहन देखील प्रदेशाध्यक्ष इद्रिस नायकवडी यांनी केले.

# जागतिक स्तरावरील ऑनलाइन लर्न अँड अर्न इंडिया संयुक्त पनामा अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये अनन्या काशिनाथ मोरेने मिळवले सर्वोत्कृष्ट विनर जागतिक अबॅकस स्पर्धक मानद साईटेशन

अबॅकस आणि वैदिक मॅथमुळे विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस ए यांनी सांगितले आहे




बीड (प्रतिनिधी) अबॅकस गणित तंत्र म्हणजेच सर्वांगीण विकास होय. विविध स्पर्धेमधूनच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना शैक्षणिक वातावरण निर्मिती करून देणे आवश्यक आहे, शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. अनन्या काशिनाथ मोरेने जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये सर्वोत्कृष्ट रँकिंग मिळवून ऐतिहासिक यश मिळवलेले आहे. शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. अनन्या काशिनाथ मोरेने लर्न अँड अर्न इंडिया तसेच यु अँड इ म्यानमार पनामा अबॅकस, स्किल डेव्हलपमेंट आणि इंटरनॅशनल स्तरावरील ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिप आणि आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशन यांच्या सहकार्याने जागतिक स्तरावरील अबॅकस स्पर्धा जुलै 2024 संपन्न झालेल्या असून त्यामधील जाहीर झालेल्या निकालाप्रमाणे अनन्या काशिनाथ मोरेने सर्वोत्कृष्ट विनर प्रमाणपत्र मिळालेलं आहे. जागतिक स्तरावरील अबॅकस स्पर्धेमध्ये भारतासह, नेपाळ, श्रीलंका, यु एस ए , म्यानमार, श्रीलंका, न्युझीलँड, पनामा, इंडोनेशियाअशा जगातील दोन हजार एकूण विद्यार्थ्यांपैकी सहभाग असलेल्या अबॅकसच्या पहिल्या कॅटेगिरी लेवलच्या स्पर्धेमध्ये अनन्या काशिनाथ मोरेची जागतिक स्तरावर निवड झालेली आहे . बीडच्या सुपर जिनियस विद्यार्थ्यांमध्ये अनन्या काशिनाथ मोरेची इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक उत्कृष्ट स्पर्धक निवड करण्यात आलेली आहे. अनन्या काशिनाथ मोरेने फक्त दहा मिनिटांमध्ये अगदी बरोबर गणिते सोडवून पैकीच्या पैकी मार्क्स मिळवून ऐतिहासिक विक्रम केलेला आहे. गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न करत असल्यामुळे तसेच पालकांनी, शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे. अबॅकस तथा वैदिक गणित मार्गदर्शक डॉ.एस ए घोडके यांनी अनन्याला सतत गणितामधील असलेल्या अडचणी दूर करण्यास प्रयत्न केलेले आहे. अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख डॉ. घोडके एस ए. अनन्या काशिनाथ मोरेचे अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांमधून अनन्या काशिनाथ मोरेचे, तिच्या शाळेतील मुख्याध्यापक प्रशासकीय अधिकारी आणि नातेवाईक द्वारे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. जागतिक स्तरावरील 22 ऑक्टोबर 2024 जपान जागतिक अबॅकस चॅम्पियनशिप अनन्या काशिनाथ मोरेची निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

# मराठा सेवा संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी धनंजय शेंडगे व जिल्हासचिव पदी प्रा.पंजाबराव येडे यांची निवड!

**बीड : प्रतिनिधी**

बीड जिल्हा शासकीय विश्रामगृह येथे मराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवश्री संदीपान जाधव सर,प्रदेश संघटक शिवश्री पुरुषोत्तम जाधव सर,विभागीय अध्यक्ष शिवश्री अशोकजी ठाकरे साहेब यांच्या उपस्थितीत मराठा सेवा संघाच्या नवीन कार्यकारणीची निवड करण्यात आली.

मराठा सेवा संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी शिवश्री धनंजय शेंडगे व जिल्हासचिव पदी शिवश्री प्रा.पंजाबराव येडे यांची निवड करण्यात आली.जिल्हा कार्याध्यक्ष पदी शिवश्री जनार्दन शिंदे व शिवश्री तानाजी जंजिरे,जिल्हा उपाध्यक्ष पदी शिवश्री बबन



तांबे,शिवश्री संतोष माने,जिल्हा प्रवक्ता पदी शिवश्री बापूसाहेब शिंदे,जिल्हासंघटक पदी शिवश्री डॉ.नरसाळे यांची निवड करण्यात आली.

यावेळी संभाजी ब्रिगेड चे विभागीय अध्यक्ष राहुल वायकर,पूर्व विभगाचे अध्यक्ष नागनाथ जाधव, राष्ट्रसंत गाडगे बाबा प्रबोधन कक्षाचे जिल्हाध्यक्ष शिवश्री संतोष डोंगरे,जिल्हा सचिव शिवश्री श्रीकृष्ण उबाळे,तालुका अध्यक्ष नितीन मातकर,शिवश्री शिवाजी शिंदे,भास्कर निंबाळकर,लक्ष्मण रेडेकर,प्रा.मुटकुळे सर,किरण सावंत,विशाल घोरड,महादेव जोगदंड,सचिन पिसाळ सर,संभाजी शिंदे,हरी गोरे,गवते सर,नारायण गवते यांची प्रमुख उपस्थिती होती!

मराठा सेवा संघाच्या प्रदेश कार्यकारणीच्या आदेशानुसार मराठा सेवा संघाच्या सर्व तालुका कार्यकारणी बरखास्त करण्यात आल्या असून नवीन तालुका कार्यकारणी चे लवकरच गठण करण्यात येईल.

सर्वांनी नवीन पदाधिकारी यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या!



बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीच्या सचिवपदी यशवंत कदम यांची निवड झाल्याबद्दल चौसाळा येथे सत्कार करताना चौसाळा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष विवेक कुचेकर,प्रदीप ईगोंले,वसीम जहागिरदार,प्रदीप चव्हाण सह आदी.

# मुख्यमंत्री शिंदेंनी महाराजांची बाजू घेतल्याने शेख नदीम यांचा शिव सेनेला जय महाराष्ट्र

बीड (प्रतिनिधी) - शिवसेना शिंदे गटाचे विभाग प्रमुख शेख नदीम यांनी पक्षाचे प्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इस्लाम आणि पैगंबरांबद्दल अर्वाच्य वक्तव्य करणाऱ्या रामगिरी महाराजाची बाजु घेत मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या तसेच सत्याला सोडून चुकीची साथ देत असल्याबद्दल शिंदे सेनेच्या पदाचा राजीनामा देत जय महाराष्ट्र केला आहे.

शेख नदीम हे गेल्या वर्षभरापेक्षा जास्त कालावधीपासून शिवसेनेत शिंदे गटाचे विभाग प्रमुख पदावर कार्यरत होते. पक्षासाठी त्यांनी चांगली भरीव कामगिरी केली होती. विशेष म्हणजे मुस्लिम समाजाला तसेच तरुण पिढीला पक्षासोबत जोडण्याचे काम त्यांनी मोठ्या कुशलतेने केले होते. परंतु नुकतेच उपद्व्यापी रामगिरी महाराजांनी इस्लाम आणि



पैगंबरांबद्दल नको ते बरडल्याने इस्लाम धर्माची भावना दुखवली आहे. यात महाराज दोषी असताना सुद्धा शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख तथा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराजांची बाजू घेत त्यांच्या केसालाही धक्का लागू देणार नाही असे वक्तव्य केले. यामुळे राज्याचे प्रमुख म्हणून जो निष्पक्षपणा मुख्यमंत्र्यांकडे असायला हवा तो त्यांनी दाखविला नाही तसेच सर्व धर्म समभाव या नीतीवर ते अंमलबजावणी करत असल्याचे दिसत नाही. यामुळे मुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे मुस्लिम समाजाच्या भावना मोठ्या प्रमाणात दुखावल्या गेल्या असून मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याबद्दल समाजात मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त केला जात आहे. अशा स्थितीत यापुढे शिंदे सेनेच्या पदावर राहणे शक्य नसल्याचे सांगत शहर संघटक पदावर राहणे इस्लाम, पैगंबर आणि एक मुसलमान म्हणून शक्य नसल्याने आपल्या पदाचा राजीनामा देत असल्याचे शेख नदीम यांनी म्हटले असून आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

# रक्षाबंधनाच्या दिवशी मुख्यमंत्री महोदयांच्या लाडक्या बाळंतिण बहिणीची हेळसांड ;लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्र गळती प्रकरण , दुरुस्तीसाठी ५ लाखांचा निधी महिनाभरापासून पडुन :- डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश (प्रतिनिधी)**

:- ( दि.१९) आज दि.१९ सोमवार रोजी सुनिता अमोल बोरखेडे रा.बोरखेड ता.जि.बीड हिची दुपारी १२ वाजता लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसुती झाली.मात्र दुपारनंतर आलेल्या पावसामुळे लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत गळत असल्याने प्रसुती विभागात असलेल्या बाळंतीणीची चांगलीच हेळसांड झाली. प्रसुती विभागातील बेडवर गळणारे पाणी आणि त्याच बरोबर सुरू असलेल्या पंख्यातुन गळणारे पाणी यामुळे विद्युत प्रवाहाचा धक्का लागण्याची भिती असल्याने उकाडा असतानाही पंखा बंद करून ठेवावा लागला.या गैरसोयीबद्दल बाळंतिण सुनिता बोरखेडे यांच्या सासु रूक्मिणी बोरखेडे यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांचा बांधकाम विभागाकडे प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्ती साठी




५ लाख रुपयांचा निधी वर्ग केला म्हणत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न :- डॉ.गणेश ढवळे महिनाभरापूर्वी दि.१५ जुलै रोजी लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मुख्य इमारतीला गळती लागली असुन तातडीने दुरुस्ती करण्यात यावी असे लेखी निवेदन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी डॉ.उल्हास गंडाळ जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड यांची प्रत्यक्ष भेट घेऊन दिले होते.त्यानंतर दुस- याच दिवशी दि.१६ जुलै रोजी कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक १ जिल्हा परिषद बीड यांना डॉ.उल्हास गंडाळ यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र लिंबागणेश ईमारत दुरूस्तीसह ईतर कामांसाठी ५ लक्ष रुपये निधीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदरील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रूग्णांची हेळसांड व गैरसोय होऊ नये आरोग्य सेवेवर परिणाम होणार नाही याकरीता आपणाकडून बांधकामाबाबत लवकरात लवकर पुढील कार्यवाही करण्यात यावी असे लेखी आदेश दिले आहेत मात्र या घटनेला महिना उलटूनही अद्याप कोणतीही हालचाल करण्यात आलेली नसुन डॉ.उल्हास गंडाळ हे आम्ही निधी बांधकाम विभागाकडे वर्ग केला असुन पुढील कार्यवाही बांधकाम विभागा मार्फत करण्यात येईल म्हणत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करताना दिसुन येत आहे.

# एक धाव सुरक्षेची म्हणत बीडकर धावले अन जिंकलेहीः!

## महसुल पंधरवड्यात महामॅरेथॉन उत्साहात संपन्न

## जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी दाखविली हिरवी झेंडी

**परळी वैद्यनाथ, प्रतिनिधी):-**


बीड, दि. 19 ऑगस्ट : 'एक धाव सुरक्षेची'...' हे घोषवाक्य घेऊन #बीडकर आज सकाळी ७ वाजता अंबिका चौक बीड – संत सेवालाल महाराज चौक अशा दोन किलोमीटरच्या महामॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झाले... धावले आणि जिंकलेही....!

सकाळी सात वाजता सुरु झालेली ही दोन किलोमीटरची महामॅरेथॉन स्पर्धा ! पर्यावरण वाचवा.. जीवन वाचवा, झाडे लावा..झाडे जगवा, अर्थिंगचे योग्य संचलन-करेल घराचे रक्षण, पुरा पूर्वी पशु प्राण्यांना बांधू नका, त्यांचा जीव धोक्यात घालून नका, "सुरक्षेला महत्त्व द्या', रस्ते अपघात टाळा, रस्ता सुरक्षेला महत्त्व द्या, ध्वनी प्रदूषणाला घाला आळा, 'वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळा' असे अनेक जनजागृतीपर संदेश देत सोमवारची पहाट उजाडली. पूर, भूकंप, हृदय विकाराचा झटका, सर्पदंश, त्सुनामी, आग, वीज आदींबाबत जनजागृती करण्यात आली. या महामॅरेथॉन स्पर्धेच्या आयोजनाची तयारी बीड जिल्हा प्रशासनाने केली होती. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणा अंतर्गत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पोलीस अधिक्षक कार्यालय, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, चौरंग संस्था, नगरपरिषद, सामजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ही महामॅरेथॉन संपन्न झाली.

जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. पंडीत चव्हाण यांनी महामॅरेथॉन स्पर्धेला हिरवी झेंडी दाखविली. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्री. सुधाकर टाक, पोलीस उपनिरीक्षक वाहतूक श्री. विजय जाधवर आदींची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेत मुली व महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला तसेच ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिक यांनीही स्पर्धेत सहभागी होत स्पर्धकांचा उत्साह द्विगुणित केला. बंकटस्वामी महाविद्यालयाचे राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रा. जगन्नाथ चव्हाण सर हे त्यांच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थ्यांसह उपस्थित होते. तसेच सौ. के.एस.के. व बलभीम महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी होते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे फलक हाती घेत विद्यार्थ्यांनी जनजागृतीकडे लक्ष वेधले होते.

नैसर्गिक आपत्तीच्या काळात खबरदारी, प्रतिबंधात्मक उपायांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याचे कामही या महामॅरेथॉन स्पर्धेतून करण्यात आले. छोट्या मुलींपासून ते वयोवृद्ध या स्पर्धेमध्ये सहभागी होत उत्साहाच्या वातावरणात मॅरेथॉन स्पर्धेचा मूळ उद्देश पूर्ण करत 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्'च्या घोषणा देत महामॅरेथॉन स्पर्धा उत्साहात संपन्न झाली.

महामॅरेथॉन स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावनाऱ्या विजयी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. दरम्यान उपस्थित मान्यवरांनी स्वाक्षरी



फलकावर स्वाक्षरा केल्या.

शालेय मुले-मुली, एनसीसी कॅडेट्सचे विद्यार्थी, स्काऊट गाईडचे विद्यार्थी, होमगार्ड, राष्ट्रीय सेवा योजना, आपत्ती व्यवस्थापनमध्ये काम करणारे श्री. बाबासाहेब कोकाटे धर्मराज बहुउद्देशीय संस्था व श्री. स्वप्नील कोकाटे सुमन सामाजिक संस्था यांचेसह स्वयंसेवक आपदा मित्र आदींचा सहभाग उत्साहवर्धक होता. या मॅरेथॉन कार्यक्रमामध्ये आपत्ती व्यवस्थापनमध्ये काम करणारे स्वयंसेवक आपदा मित्र यांना महसूल पंधरवड्यानिमित्त प्रशस्तीपत्र वाटप करण्यात आले. या महामॅरेथॉन स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिवकुमार स्वामी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, नगरपरिषदेच्या अधिकारी, पोलीस विभाग, आरोग्य विभाग व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. संचालन करून आभार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुधाकर टाक यांनी मानले.

# मनोज जरांगे पाटील यांची प्रकाश आंबेडकर यांना कळकळीची विनंती, पाहा नेमकं काय आवाहन

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांना कळकळीची विनंती केली आहे. "प्रकाश आंबेडकर हे समाजाचे ज्येष्ठ नेते आहेत. आम्ही त्यांचा आदर करतो. गरजवंत समाजासाठी प्रकाश आंबेडकर यांनी परत यावे. मनधरणी करण्याची वेळ लागू नये. चळवळ आंबेडकर यांनीच मोठी केली आहे", असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. "प्रकाश आंबेडकर यांना आम्ही मानतो. त्यांच्यावरोधात मी बोलणार नाही. प्रकाश आंबेडकर यांनी चळवळ मोठी केली. परिवर्तन त्यांनीच केलं आहे. आंबेडकर यांनी न्यायाच्या बाजूने उभे राहावे. ते महामानवांचे वंशज आहेत. त्यांना मनधरणी करण्याची गरज नाही. गोरगरीब लोकांसाठी लढणाऱ्या लोक नेत्यांनी एकत्र या. माझे आवाहन आहे. जातीसाठी जेलमध्ये जाण्यास नेत्यांनी सज्ज व्हावे", असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं.

"सर्वच गरजवंत समाजासाठी काम करायचे आहे. राज्यात अनंत प्रश्न आहेत, ते सोडवायचे आहेत. परळी आणि बीडसह राज्यातील अनेक ठिकाणचे इच्छुक लोक भेटून जात आहेत. गोरगरीब लोकांचे प्रश्न मिटवले पाहिजेत. शेतकरी, विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत. भाजपमधील अनेक लोक माझ्याकडे उमेदवारीच्या मागणीसाठी आले आहेत. आतापर्यंत 47 लोकांनी माझी भेट घेतली आहे. सत्तेतले लोक मला रात्री भेटायला येत आहेत", अशी माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली.







मनोज जरांगे यांची लाडकी बहीण योजनेवर प्रतिक्रिया

"माझ्यावर ड्रोनच्या साहाय्याने वॉच ठेवले जात आहे", असंदेखील मनोज जरांगे यांनी सांगितलं. "धनगर समाजाला दहा वर्षांपासून वेड्यात काढण्याचे काम सुरू आहे", असा आरोप मनोज जरांगे यांनी केला. "लाडकी बहीण योजनेला मी नाव ठेवत नाही. योजना कुठल्याही चांगल्याच असतात. मला योजनेचा विरोध नाही. तुमचे 1500 रुपये आम्हाला आयुष्यभर पुरणार नाहीत. आमच्या लेकरांचा संघर्ष पाहा", असंदेखील मनोज जरांगे पाटील म्हणाले. जरांगे यांची फडणवीसांवर टीका दरम्यान, मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली. "देवेंद्र फडणवीस तुम्हीच मंत्री छगन भुजबळ यांना आमचे प्रमाणपत्र बोगस आहेत, असे बोलण्यास सांगितले. माझ्यावर SIT का नेमली? कारण काय? एवढा रोष कशामुळे आहे? पोलीस अधिकाऱ्यांनी आम्हाला गोळ्या घातल्या, त्याला तुम्ही बढती दिली. मराठ्यांना मारहाण करण्यासाठी तुम्ही दुसऱ्या जातीचे पोलीस आणले. पोलीस आमच्या बायकांच्या मुंडक्यावर पाय देत होते. फडणवीस साहेब तुम्हाला लाज वाटली पाहिजे. अनेक महिला आमच्या तडीपार केल्यात", अशी टीका मनोज जरांगे यांनी केली.

## केज शहरात घरात घुसले पावसाचे पाणी ; वार्ड क्र.१६ मध्ये तलावाचे स्वरुप !

**केज । शेख सज्जाद**

मुसळधार पावसामुळे केज शहरातील वार्ड क्रमांक १६ या परिसरातील घरांमध्ये आणि दुकानांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान होते आहे. काही ठिकाणी रस्त्याच्या बाजूच्या नाल्या बरोबर न झाल्यामुळे गुडघाभर पाणी साचल्याने तलावाचे स्वरुप प्राप्त झाले. दि.१९ ऑगस्ट २०२४ रोजी रात्री सात पासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे केज शहरातील काही भागांमध्ये पाणी शिरल्याने मोठी तारांबळ उडालीयं. केज शहरामध्ये सातच्या सुमारास मुसळधार पावसाला सुरूवात झाली. शहरात नवीन रोड व नाल्या बनवल्यामुळे पाण्याचा निचरा होत नसल्याने पावसाचे पाणी लोकांच्या घरात जात आहे. घरात शिरलेले पाण्यामुळे लोकप्रतिनिधी व प्रशासनाविरोधात नागरिक संताप व्यक्त करत आहेत. तसेच ही परिस्थिती प्रत्येक पावसात येत असल्याने यापुढे आमच्या घरात किंवा दुकानात पाणी शिरणार नाही अशी व्यवस्था लोकप्रतिनिधीनी व प्रशासनाने करावी अशी मागणी नागरिक करत आहेत.

## जागतिक छायाचित्र दिन उत्साहात साजरा

हिंगोली :- ( प्रतिनिधी ) प्रेस फोटोग्राफर व फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात जागतिक छायाचित्र दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील पाठक यांच्या हस्ते कॅमेऱ्याची पूजा करण्यात आली. यावेळी जेष्ठ फोटोग्राफर संतोष अर्धापुरकर यांनी कॅमेऱ्यात होणाऱ्या आधुनिक बदला संदर्भात माहिती दिली, नवीन नवीन आधुनीक टेक्नॉलॉजीचा वापर फोटोग्राफर यांनी केला पाहिजे. कॅमेरात होणाऱ्या बदला संदर्भात संपूर्ण माहिती घेणून काम करावे. जेणेकरून फोटो पाहून ग्राहकाचे मन प्रसन्न झाले पाहिजे. ग्राहक प्रसन्न झाला तर त्यातच आपले खरे कौशल्य दिसत होते. अशी माहिती दिली. यावेळी जिल्हाध्यक्ष गजानन थोरात,



संतोष अर्धापुरकर, सुधाम ढवे, संदीप बोरकर, विजय गुंडेकर,निलेश गरवारे, राजू गवळी,सुनिल प्रधान, बालाजी वाबळे, सचिन जैन,सचिन बंडाळे, बालाजी पारोळकर,प्रज्वल कान्हेड, पिंटू तरोडे, आर्या पवार, पंढरी गायकवाड,शेख आवेज, आदी उपस्थीत होते.

जागतिक छायाचित्र दिनानिमित्त गोवा येथील 5दिवसीय कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. 25 ऑगस्ट 30 ऑगस्ट पर्यंत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे या कार्यशाळेला हिंगोली जिल्हा प्रेस फोटोग्राफर असोसिएशन व जिल्हा फोटोग्राफर असोसिएशन चे सर्व पदाधिकारी जाणार आहेत.

# केज तालुक्यात शेतात काम करीत असलेल्या महिलेचा विनयभंग

### दीड महिन्या पासून करीत होता महिलेचा पाठलाग : पीडितेला गावातून हाकलून दिण्याची दिली होती धमकी!

**केज ।प्रतिनिधी**

शेतात सोयाबीनच्या पिकातील तण काढीत असलेल्या अनुसूचित जातीच्या विवाहित महिलेचा गावातील एका नराधमाने विनयभंग केल्याची घटना घडली आहे. या बाबतची माहिती अशी की, दि. १७ ऑगस्ट रोजी केज तालुक्यातील एका गावात एक अनुसूचित जातीची महिला व तिची भावजय या दोघी सोयाबीनच्या पिकातील तण काढीत होत्या. त्यावेळी दुपारी २:१५ वा. आनंद सुधाकर कातमांडे हा शेतात तिच्या पाठी मागून जाऊन तिच्याशी झोंबाझोंबी केली. व तिच्याशी ओढाओढी करून तिला खाली पडले आणि विनयभंग केला. तसेच ती त्याला आवडते असे सांगून तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केली. त्या महिलेने आरडाओरड केल्या नंतर तिची भावजय आली. पीडित महिलेची त्याच्या पासून सुटका करीत असताना आनंद कातमांडे याने तिला शिवीगाळ करून चापटाने मारहाण केली. आणि खोटा गुन्हा दाखल करून जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे पीडित महिला घाबरून गेली होती. तसेच तिचे पती व वडील घरी नव्हते. दि.१९ ऑगस्ट रोजी पीडित महिलेच्या तक्रारी वरून आनंद कातमांडे यांच्या विरुद्ध केज पोलिसात गु. र. नं. ४५९/२०२४ भा. न्या. सं. ७४, ७५, ७६, ७८, ७९, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक आनंद शिंदे हे तपास करीत आहेत.

महिला अनुसूचित जाती पैकी असताना गुन्हेगाराला ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल नाही ? :- पीडित महिला ही अनुसूचित जातीतील असताना आणि गुन्हेगार हा तिला ओळखत असताना सुद्धा त्याच्या विरुद्ध अनुसूचित जाती व जमाती अन्याय अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ नुसार कारवाही केली गेली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे .

दीड महिन्यापासून नराधम करीत होता पीडितेचा पाठलाग ! :- सुधाकर कातमांडे हा मागील एक ते दिड महीण्या पासुन ती विवाहित रस्त्याने ये-जा करताना आणि शेताकडे जाताना तिच्या मागे-पुढे चालुन पाठलाग करून हातवारे व इशारे करुन जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु पिडितेने त्याला वांरवार विरोध केला असता. जिवे मारण्याच्या व गावातून हाकलुन देण्याची धमकी देत होता.

**इज्जतीच्या भीतीने पिडीतेने केली नाही तक्रार :-**

पीडितेच्या सासर व माहेर एकाच गावात असल्याने गावात व सर्वात इज्जत जाईल. म्हणून तिने याची वाच्यात केली नव्हती; परंतु त्याने नंतर तिला जास्त त्रास द्यायला सुरुवात केली. म्हणून तिने ही माहिती नवरा व वडिलांना दोघांना दिली. त्यांनी त्याला समज देखील दिली होती.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिवंगत यशश्री शिंदे यांच्या कुटुंबियांची घेतली सांत्वनपर भेट.

**उरण । प्रतिनिधी**

बौद्ध विद्यार्थिनी यशश्री शिंदे या युवतीची निर्घून हत्या झाल्याची मानवतेला कलंक लावणारी घटना उरण मध्ये नुकतीच घडली. त्या दिवंगत यशश्री शिंदेंच्या घरी आज उरण मध्ये रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी भेट देऊन शोकाकुल शिंदे कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. सामाजिक न्याय विभागातर्फे दिवंगत यशश्री शिंदे कुटुंबीयांना आठ लाख २५ हजाराची सांत्वनपर मदत आणि रिपब्लिकन पक्षातर्फे एक लाखाची मदत लवकरच देण्याचे आश्वासन ना .रामदास आठवले यांनी दिले. "दिवंगत यशश्री शिंदे यांच्या हत्येचा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी. विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची सूचना " ना.रामदास आठवले यांनी केली.दिवंगत यशश्री शिंदे यांचे वडील कंत्राटी कामगार असून तिला दोन बहिणी आहेत. त्यातील मोठ्या



बहिणीला समाज कल्याण विभागा तर्फे तातडीने चांगली नोकरी मिळवून देण्याची सूचना ना. रामदास आठवले यांनी रायगड जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांना यावेळी दिले. यशश्री शिंदे यांच्या मारेकऱ्याला फाशीची शिक्षा दिली पाहिजे अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी केली. महिला अत्याचार बलात्कार आणि हत्या रोखण्यासाठी सरकार ने शक्ती कायदा करून फाशीची शिक्षा करण्याचा कठोर कायदा केला आहे तरी असे निर्घृण प्रकार घडत आहेत. फाशीची शिक्षा असणारा कठोर कायदा असताना लव्ह जिहाद साठी नवीन कायद्याची गरज नाही आणि लव्ह जिहाद हा प्रकार आपण मानत नाही असे ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले. दिवंगत यशश्री शिंदे यांच्या कुटुंबियांची अनेक राजकीय नेत्यांनी मंत्र्यांनी भेट घेतली, मात्र राज्य सरकार तर्फे किंवा कोणत्याही नेत्या तर्फे आम्हाला सांत्वानपर आर्थिक मदत मिळाली नसल्याची खंत दिवंगत यशश्री शिंदे यांच्या वडिलांनी व्यक्त केली.समाज कल्याण विभागतर्फे तातडीने ८ लाख २५ हजाराची सांत्वनपर मदत देण्याचे निर्देश ना. रामदास आठवले यांनी समाज कल्याण अधिकाऱ्यांना दिले.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड,मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे, प्रमोद महाडिक,राहुल डाळिंबकर, प्रभाकर कांबळे, उरण तालुकाध्यक्ष संजय गायकवाड, डॉ प्रकाश शेंडगे, प्रकाश कमलाकर जाधव, सुमित मोरे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077